पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 25/01/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर मौजा काटोल शिवार हनुमान नगर येथे दिनांक 23/01/2020 ते दिनांक 24/01/2020 चे 11:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अतुल हेमराज कुकडे, वय 25 वर्ष, रा. नायगाव चिचाळा यांचे ठेक्याचे शेतातील गोठयाचे अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन आत प्रवेश केला. तसेच आरोपीने गोठयात ठेवलेले कापसाचे चार ते पाच बोरे कापुस अंदाजे 3 क्विंटल कि. 15,000/–रु. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर दुय्यम निबंधक कळमेश्वर, जि. नागपूर येथे दिनांक 26/06/2005 चे 11.00 वा. ते 17.00 वा. पर्यंत आरोपी क्र. 1) सुनील रामजीवन नरेडी, रा. प्लॉट नं 168 रा पो शिवाजी नगर, नागपुर याने फिर्यादी नामे– अरूनकुमार फुलचंद तडैय्या, वय 66 वर्ष, रा. मस्कासाथ श्रीमती भवन दयाराम वस्तादाचे आखाडया जवळ, तेलीपुरा नागपुर यांची दिशाभुल करून प्लॉट विकत घ्यावे या करीता अप्रामाणिकपणे विश्वसात घेउन प्लॉटचे संपुर्ण कागदपत्र बरोबर असल्याचे भासुन त्याचे नावाने प्लॉट नसतांना सुध्दा ते प्लॉट वीकुन फिर्यादीची फसवणुक केली. तसेच आरोपी क्र. 2) तत्कालीन दुय्यम निबंधक कळमेश्वर, रा. दुय्यम निबंधक कार्यालय, कळमेश्वर याने सदर प्लॉटची नोंदणी करत असतांनी अभीलेखा प्रमाने प्लॉट हे विकणाऱ्याच्या नावी आहे किंवा नाही याबाबत खऱ्या कागपत्राची पाहणी न करता नोंदणी केली. तसेच आरोपी क्र. 3) निलेश बाबुराव बागडे, वय 25 वर्ष, रा. प्रभाग क्र. 1 कळमेश्वर, जि. नागपुर याने आम मुखत्यार पत्राचा गैरवापर करून फसवणुक करण्याचा उद्देशाने सदर व्यवहारातील प्लॉट हे पुर्वीच इतर लोकांना विकले. तसेच आरोपी क्र. 4) रामराव धनराज गोंडाणे, रा. कळमेश्वर याने सदर व्यवहाराबाबत सर्व माहीती असुन ही फसवणुक करण्याचा उदेशाने साक्षीदार म्हणुन वेगवेगळया झालेल्या व्यवहारातील खरेदी खतावर सही केली वरील आरोपीतांमुळे फिर्यादींची फसवणुक झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 417, 420, 34 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. कर्मलवार 9021452760 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर